# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 14.10.2025** **वार- मंगळवार**

---

**<u>अभामसासं</u>**

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला, ही एक आनंदाची बाब आहेच, मात्र, मराठी भाषेचं सौंदर्य ज्यांनी वाढवलं आणि समृध्द केलं त्यांच्या ऋणात राहणंच मी पसंत करेन, मराठी भाषेत संस्कृतीचा ओलावा असल्यामुळेच मराठी ही सगळ्यात समृद्ध भाषा आहे, असं मत ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष प्रसिद्ध कादंबरीकार विश्वास पाटील यांनी व्यक्त केलं.

पुण्यभूषण फाउंडेशनतर्फे आज पुण्यभूषण दिवाळी अंकाचं प्रकाशन राज्याचे उच्च आणि तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील आणि अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष विश्वास पाटील यांच्या हस्ते कोथरूडमध्ये झालं, त्यावेळी ते बोलत होते. यंदा या दिवाळी अंकाचं १५ वं वर्ष आहे.

भाषा ही ज्ञानोबा आणि तुकोबांची आहे. साने गुरूजी, आचार्य अत्रे अशा अनेक लेखकांची परंपरा मराठी साहित्याला लाभली आहे. मराठी शाळा सुरू राहिल्या पाहिजेत. मराठी शाळांना पटसंख्येची मर्यादा किंवा बंधनं घालू नयेत असं विश्वास पाटील यावेळी म्हणाले.

पुण्याचं वैविध्य आणि वैशिष्ट्यांचा विचार केला, तर एक भलामोठा दिवाळी अंक तयार होईल, एवढी वैविध्यता पुण्यामध्ये आहे. त्यामध्ये पुण्यातील व्यक्ती, संस्था, वास्तू अशा अनेक गोष्टी आहेत असं चंद्रकांत पाटील म्हणाले.

पुण्यभूषण दिवाळी अंकाच्या पहिल्या पानाचे मानकरी प्रकाश चाफळकर आणि अरविंद चापळकर यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. पुण्यभूषण फाउंडेशन, पुणेचे अध्यक्ष डॉ. सतीश देसाई यांनी दिवाळी अंक प्रकाशित करण्यामागील भूमिका विशद केली.

**<u>ई-ड्राइव्ह</u>**

केंद्र सरकारच्या 'प्रधानमंत्री ई-ड्राइव्ह' योजनेंतर्गत पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या ताफ्यात लवकरच एक हजार इलेक्ट्रिक बस दाखल होणार आहेत. राज्य सरकारच्या निर्देशानुसार या गाड्या खरेदी करण्याचा प्रस्ताव 'रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया' आणि केंद्रीय अवजड उद्योग मंत्रालयाकडे सादर करण्यात आला आहे. 'अवजड उद्योग खात्याचे मंत्री एच. डी. कुमारस्वामी यांची भेट घेऊन या विषयावर सविस्तर चर्चा केली आहे आणि त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे अशी माहिती केंद्रीय राज्यमंत्री आणि पुण्याचे खासदार मुरलीधर मोहोळ यांनी दिली.

**<u>निवडणुका</u>**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी राज्य निवडणूक आयोगानं स्थानिक यादीऐवजी आयोगाचीच मतदार यादी वापरण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार १ जुलै २०२५ ची मतदार यादी अंतिम मानली जाणार आहे. त्यात राज्य निवडणूक आयोगानं पुणे महापालिकेला मतदार यादी पाठवितानाच १ जुलैनंतर नोंदणी झालेली नावं वगळली आहेत. त्यामुळे महापालिकेचं प्रभागनिहाय मतदार यादी तयार करण्याचं काम सोपं झालं आहे.

**<u>हरकतीसूचना</u>**

पुणे जिल्ह्यातील १४ नगरपरिषदा आणि ३ नगरपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठीच्या प्रारूप मतदारयादीवर हरकती-सूचना नोंदविण्यास मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्य निवडणूक आयोगानं केलेल्या सूचनेनुसार ही मुदत येत्या शुक्रवारपर्यंत म्हणजे १७ ऑक्टोबरपर्यंत वाढविण्यात आल्याची माहिती पुणे जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

**<u>वस्तूसंकलन</u>**

सणांच्या पार्श्वभूमीवर घरगुती कचऱ्याचं योग्य व्यवस्थापन व्हावं यासाठी पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत निरुपयोगी वस्तू संकलनाचं महाअभियान राबविण्यात आलं. 3 दिवसांच्या या उपक्रमात २५ टनांहून अधिक उशा, गाद्या, फर्निचर, ई कचरा, प्लॅस्टिक कचरा अशा विविध प्रकारच्या वस्तु आणि कचरा जमा करण्यात आला. पुनर्वापर संकल्पनेनुसार या वस्तु आणि कचऱ्यावर पुढची प्रक्रिया केली जाणार आहे, अशी माहिती घनकचरा

**<u>अग्निशमन</u>**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या चऱ्होली उपअग्निशमन केंद्रामार्फत सांडपाणी शुद्धीकरण केंद्रात वायु गळती, स्वतःचा आणि इतरांचा बचाव, आग आणि आगीचे प्रकार तसेच आग विझविण्याच्या पद्धतींवर आधारित सरावाचं आयोजन करण्यात आलं होतं. यावेळी अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांनी उपस्थित कर्मचारी आणि नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीत काय करावं आणि काय करू नये, याबाबत मार्गदर्शन केले.

**<u>निधन</u>**

पुण्याचे माजी महापौर बाळासाहेब शिरोळे पाटील यांचं आज सकाळी पुण्यात एका खाजगी दवाखान्यात निधन झालं. ते 92 वर्षांचे होते. १९७४ आणि १९७९ साली सलग दोन वेळा ते पुणे

महानगरपालिकेमध्ये नगरसेवक म्हणून निवडून आले होते. प्रथम वाहन व्यवहार समितीचे अध्यक्ष आणि नंतर वर्ष १९८३-८४ मध्ये शिरोळे पाटील पुणे शहराचे महापौर होते.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आजही कमाल तापमान ३३ अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. किमान तापमान १८ अंश सेल्सिअस होतं.

**तर हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविधभारती पुणे केंद्रावर संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांत मध्ये. नमस्कार.**